PUDHARI_MUMBAI_27...

# ५ वा लोणावळा चित्रपट महोत्सव आजपासून

## रसिकांना ऑनलाईनद्वारे चित्रपटांची मज्जा लुटता येणार

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

यंदाचा ५ वा लोणावळा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (लिफी) २०२० आजपासून सुरू होत आहे. हा महोत्सव २७ ते २९ नोव्हेंबर, ४ ते ६ डिसेंबर आणि ११ ते १३ डिसेंबर या दरम्यान सायंकाळी ६ वा. ऑनलाईन आयोजित करण्यात आला आहे. ५ व्या लोणावळा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२० यंदा कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे ऑनलाईन आयोजित केला आहे. या महोत्सवात एकूण ९ हिंदी चित्रपट तसेच वेगवेगळ्या भाषांमधील ४ लघुपट दाखविले जाणार आहेत.

### दिग्गज चर्चासत्रात सहभागी होणार

● या महोत्सवाचे संचालन माधव तोडी आणि संकल्पना व आखणी विवेक वासवानी यांनी केली आहे. तर अनंत महादेवन, संगीतकार आनंद-मिलिंद, प्रवेश सिप्पी, दिव्य सोलगामा यासारख्या दिग्गजांचा सत्रात सहभाग असेल.

ऑनलाईन असल्याने मोठ्या संख्येने लोकांना महोत्सवातील चित्रपट पाहता येईल. त्यासाठी प्रेक्षकांना प्लेक्सिगो (यूएफओ मूव्हीजचा एक भाग) हे मोबाईल ॲप www.onelink.to/Plexigo येथून डाऊनलोड करावे लागेल.

लिफीच्या पाचव्या महोत्सवात उत्कृष्ट चित्रपट निर्माते एन. एन. सिप्पी यांना श्रद्धांजली वाहिली जाणार आहे. तसेच त्यांच्या वो कौन थी, गुमनाम, देवता, सरगम, फकिरा, चोर मचाए शोर आणि अन्य काही उत्कृष्ट चित्रपट प्रदर्शित केले जाणार आहेत. या व्यतिरिक्त 'पापा कहते है' आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रशंसा लाभलेला 'मुक्ती भवन' हा चित्रपटही दाखविला जाणार आहे. त्यामुळे हा चित्रपट महोत्सव आगळावेगळा ठरणार आहे.